ePaper
‘वंदे मातरम’वरून राजकारण तापलं! भाजपाकडून विशेष ठराव संमत

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 23 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

पिंपरीत लघुउद्योजक आक्रमक!

## बेंगळुरू विमानतळावर मोबाईल बंद, कर्नाटकात मोठी खळबळ

# आयएएस अधिकारी विमानतळावरून गायब!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कर्नाटकमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कर्नाटक केडरचे आयएएस अधिकारी ज्ञानेंद्र कुमार गंगवार हे दोन दिवसांपूर्वी विमानतळावरून अचानक बेपत्ता झाल्याचे वृत्त समोर आले होते. याबाबतची माहिती खुद्द कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांनी एका निवेदनाच्या माध्यमातून दिली होती. या घटनेमुळे कर्नाटकच्या प्रशासनात मोठी खळबळ उडाली होती. या घटनेच्या दोन दिवसानंतर म्हणजे आज (२२ ऑगस्ट) अखेर बेपत्ता झालेल्या आयएएस अधिकाऱ्याबाबत गृहमंत्री प्रियांक खर्गे यांनी ट्विट करत मोठी माहिती दिली आहे.**



कर्नाटक केडरचे २०१६ च्या बॅचचे आयएएस अधिकारी ज्ञानेंद्र कुमार गंगवार हे दोन दिवसांपासून म्हणजे २० ऑगस्टपासून अचानक बेपत्ता झाल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्यांच्याशी कोणताही संपर्क होत नव्हता. तसेच त्यांचा फोन देखील बंद होता. त्यामुळे कर्नाटकच्या प्रशासनात एकच खळबळ उडाली होती.

यानंतर याबाबत कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांनी एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट शेअर करत ज्ञानेंद्र कुमार गंगवार हे बेपत्ता झाल्याच्या घटनेसंदर्भात माहिती दिली होती. त्यानंतर पोलीस प्रशासनाकडून त्यांच्या शोधासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले होते. या संदर्भातील वृत्त टाइम्स नाऊने दिलं आहे.

वृत्तानुसार, आयएएस अधिकारी ज्ञानेंद्र कुमार गंगवार हे २० ऑगस्ट रोजी सकाळी बंगळुरूच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले होते. त्यांचं शेवटचं लोकेशन तेथील होतं. मात्र, त्यानंतर ते अचानक गायब झाले. त्यांचा फोनही बंद येत होता. त्यामुळे ते नेमकं कुठे गेले? याबाबत मोठी चर्चा सुरू झाली होती. त्यांचा शोध घेण्याचं कामही सुरू करण्यात आलं होतं. मात्र, आयएएस अधिकारी अचानक बेपत्ता झाल्याच्या घटनेमुळे राज्यभरात हा चर्चेचा विषय ठरला.

दरम्यान, बंगळुरू विमानतळावरून अचानक ज्ञानेंद्र कुमार गंगवार हे बेपत्ता झाल्याचे वृत्त समोर आले होते. या प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. संबंधित अधिकाऱ्याने नंतर सरकारशी संपर्क साधला असून त्यांनी कौटुंबिक कारणास्तव आणि काही इमर्जन्सी परिस्थितीमुळे रजा घेतली होती आणि ते आपल्या मूळ गावी गेले होते. या काळात ते त्यांच्या दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांच्या ठिकाणाबाबत गोंधळ निर्माण झाला होता. त्यामुळे तर्कवितर्कांना उधाण आलं होतं. मात्र, त्यानंतर त्यांनी सरकारशी संपर्क साधला आणि वस्तुस्थिती सांगितली आहे, असा खुलासा आज (२२ ऑगस्ट) गृहमंत्री खर्गे यांनी एक्सवरील पोस्टमध्ये केला आहे.

### गृहमंत्री काय म्हणाले?

बेपत्ता झालेल्या आयएएस अधिकाऱ्याबाबत माहिती देताना एका निवेदनात खर्गे यांनी सांगितलं होतं की, अधिकारी ज्ञानेंद्र कुमार गंगवार हे बेपत्ता झाल्याच्या घटनेबाबत सरकारला दोन दिवसांपूर्वी माहिती मिळाली होती. आतापर्यंत या अधिकाऱ्याच्या कुटुंबीयांकडून किंवा इतर कोणाकडूनही कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. तसेच सरकारचा त्यांच्याशी असलेला सर्व प्रकारचा संपर्क तुटला आहे. मात्र, त्यांचा शोध घेतला जात आहे, असं खर्गे यांनी सांगितलं होतं. तसेच संबंधित अधिकारी हे बंगळुरू विमानतळावर शेवटचे दिसले होते. त्यानंतर त्यांच्याशी संपर्क झाला नाही. त्यांच्याबाबत सध्या आमच्याकडे अशी माहिती आहे की, त्यांचा शोध घेताना ते शेवटचे बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर असल्याचे आढळले होते. आम्हाला विमानतळावरून काही माहिती मिळाली असून आम्ही त्याची पडताळणी करत आहोत. प्रशासन अद्याप त्यांचा तपास करत आहे, असं गृहमंत्री खर्गे यांनी म्हटलं होतं.

# फुले दाम्पत्याला 'भारतरत्न' मिळावा

## केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस; उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

महाईन्यूज । पुणे

**'फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, ही महाराष्ट्राची भावना आहे. त्यांच्या महान कार्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी विधानसभेने केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस केली आहे,' असे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर उभारण्यात आलेल्या 'ज्ञानाई ज्ञानशिल्प' या भित्तीचित्रांचे लोकार्पण पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे उपस्थित होते. या वेळी शिल्पकार नवीन शेंबर यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, 'महिला विज्ञान, प्रशासन, संरक्षण, शेती, अंतराळ या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत, याच्या मुळाशी सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष आहे. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात आली आहे. नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे स्मारक आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून 'ज्योती-सावित्री' अभ्यास शाळा उभारण्यात आली आहे.'

'शिव-शाहू-फुले-आंबेडकर हा केवळ इतिहास नाही, तर तो महाराष्ट्राचा आत्मा आहे. आपल्या वर्तमानाचा पाया आहे. हा वारसा अजितदादांनी आपल्या कारकिर्दीत जपला. पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्यात फुले दाम्पत्याचे राष्ट्रीय स्मारक उभे राहावे, यासाठी दादांनी पाठपुरावा केला आणि विशेष निधी दिला,' असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

"लेक लाडकी', 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण', मोफत उच्च शिक्षण याद्वारे राज्य सरकार महिलांना सक्षम करत आहे. महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख देणारे 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी सक्षमीकरण' धोरण हा क्रांतिकारी निर्णय आहे,' असेही त्या म्हणाल्या.

'विद्यापीठात उभारण्यात आलेली ज्ञानाई ज्ञानशिल्पे केवळ कलाकृती नाहीत. ती शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देतात. ही शिल्पे आता विद्यार्थी आणि नागरिकांना पाहण्यासाठी खुली असतील,' असे कुलगुरू डॉ. गोसावी यांनी सांगितले. डॉ. संजय चाकणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रफुल्ल पवार यांनी आभार मानले.

### 'सावित्रीची लेक असल्याचा अभिमान'

'मराठवाड्यातील एका छोट्या गावात, शेतकरी कुटुंबात जन्मलेली मुलगी आज राज्याची पहिली महिला उपमुख्यमंत्री होऊ शकली, याचे श्रेय सावित्रीबाईंनी पेटवलेल्या ज्ञानज्योतीचेच आहे,' अशी भावना सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली.

### '३० मिनिटांत परवानग्या'

'विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्यास आठ वर्षे लागली. त्यासाठी २४ परवानग्या लागणार होत्या. या परवानग्या मिळवण्यासाठी दोन वर्षे लागतील, असे वाटत होते. मात्र, तत्कालीन पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांनी त्या ३० मिनिटांत मिळवून दिल्या. छगन भुजबळ यांनीही स्मारकासाठी पाठपुरावा केला,' अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

# पुण्याची ओळख जपण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा पाठपुरावा

महाईन्यूज । पुणे

**पुण्यातील वाहनांची ओळख असलेली 'एमएच १२' ही इंग्रजी अक्षरांची मालिका संपत आली आहे. मात्र, 'एमएच १२ १ ए' या नव्या मालिकेसह पुण्याची ओळख कायम ठेवण्याची मागणी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.**






या मागणीला गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, यासंदर्भातील मसुदा लवकरच प्रसिद्ध केला जाणार आहे. त्यावर नागरिकांच्या हरकती सूचना मागवण्यात येणार आहेत. त्यानंतर नव्या मालिकेला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

सध्या पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ) 'एमएच १२' अंतर्गत शेवटची 'झेड झेड' ही सिरीज सुरू असून, लवकरच ती संपणार आहे. ही मालिका संपल्यानंतर तीन अक्षरी सिरीज सुरू करणे शक्य नव्हते. पुण्यासाठी 'एमएच ६१' या नव्या क्रमांकाची चर्चा सुरू होती. त्यामुळे 'एमएच १२' ही पुण्याची ओळख पुसली जाण्याची शंकाही व्यक्त करण्यात येत होती. याबाबत मोहोळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला.

दरम्यान, पुणे आरटीओने रस्ते व महामार्ग मंत्रालयाला 'एमएच १२'च्या पुढे '१ ए' अशी मालिका सुरू करण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. देशात प्रथमच वाहनांच्या नंबरप्लेटवरील अक्षरांच्या सिरीजमध्ये 'अंक' आणि 'अक्षर' यांचा एकत्रित वापर केला जाणार आहे. नवीन मालिका सुरू होईपर्यंत वाहन खरेदी करणाऱ्या पुणेकरांना 'एमएच ६१' या आरटीओ कोडने वाहनांचे रजिस्ट्रेशन करून देण्यात येणार आहे.

सणासुदीच्या मुहूर्तावर वाहन खरेदी करण्यास इच्छुक ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. काही काळानंतर या वाहनांनाही नव्या मालिकेत रुपांतरीत करण्याची सुविधा किमान निर्धारित शुल्क आकारून उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# पिंपरीत लघुउद्योजक आक्रमक!

## माथाडींच्या धमक्या अन् कर नोटिसांवरून उद्योगमंत्र्यांकडे धाव

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील सांडपाणी, घातक कचरा विल्हेवाटीची समस्या, रस्ते, भुयारी गटारे, नाल्यावरील अतिक्रमणे, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, माथाडींच्या धमक्या, महापालिकेकडून देण्यात आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था कराच्या नोटिसा अशा विविध समस्यांनी त्रस्त असलेल्या लघु उद्योजकांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची नुकतीच भेट घेतली. उद्योगांच्या समस्या सोडविण्याची मागणी केली. त्यावर या प्रश्नांबाबत लवकरच स्वतंत्र बैठक घेण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिल्याचे लघुउद्योग संघटनेने सांगितले.**



औद्योगिक परिसरातील प्रलंबित प्रश्नांबाबत लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, सचिव जयंत कड यांनी मुंबईत मंत्री सामंत यांची भेट घेतली. महापालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, एसआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार या वेळी उपस्थित होते.

महापालिकेने स्थानिक स्वराज्य संस्था कराची रक्कम शिल्लक असल्याच्या नोटिसा उद्योजकांना दिल्या आहेत. सर्व रकमेची वसुली केलेली असतानाही नोटिसा काढून उद्योजकांमध्ये भीतीचे वातावरण तयार केले आहे. महापालिकेने एमआयडीसीच्या भूखंडावर उभारलेले गाळे भाडेदर निश्चित करून वाटप करावेत. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधावा. औद्योगिक परिसरातील घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेने एक प्रकल्प उभारावा. कुदळवाडी, चिखली, तळवडे या औद्योगिक परिसरातील रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करावे, अशी मागणी लघुउद्योजकांनी केली आहे.

उद्योगांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी सहा विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी महावितरणाला जागा द्यावी.

एमआयडीसीत नवीन उद्योगासाठी जागा उपलब्ध नाही. मात्र, झोपडपट्ट्यांमध्ये वाढ होत आहे. त्यावर नियंत्रण ठेवावे. अनधिकृत भंगार दुकाने सुरू असून, चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे ही दुकाने कायमस्वरूपी बंद करावीत. स्वयंघोषित अनधिकृत माथाडी कामगार संघटना उद्योजकांना त्रास देतात. कंपनीमध्ये चोरी वा इतर त्रास होईल या भीतीने उद्योजक तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. अशा संघटनांवर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

## हिंजवडी आयटी पार्कमधील नवीन उड्डाणपुलांसह रस्त्यांचा 'सरकारी खेळ'!

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या सोडविण्यासाठी उड्डाणपुलांसह नवीन रस्त्यांचे नियोजन करण्यात आले. या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी २०२४ मध्ये पावले उचलण्यात आली. मात्र, विविध सरकारी विभागांच्या चक्रात हे भूसंपादन अडकले असून, हे प्रकल्प अजूनही कागदावरच राहिले आहेत. आता हे भूसंपादन कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या निमित्ताने आयटी पार्कमधील प्रकल्पांचा 'सरकारी खेळ' समोर आला आहे.**



आयटी पार्कमधील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. मात्र, त्या तुलनेत रस्त्यांचे जाळे वाढले नाही. यामुळे वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट बनत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमध्ये उड्डाणपुलांसह नवीन रस्त्यांचे नियोजन केले. त्यात आयटी पार्कमधील सर्वाधिक कोंडीचे ठिकाण असलेल्या लक्ष्मी चौकात उड्डाणपूल आणि समतल विलगक बांधण्याचा प्रस्ताव आहे. याचबरोबर आयटी पार्क टप्पा एक ते तीनला जोडणाऱ्या माण रस्त्याचे सहापदरीकरण आणि उड्डाणपूल, शिवाजी चौक ते स्मशानभूमी सहापदरी रस्ता, बाणेर ते आयटी पार्क रस्ता या कामांचा समावेश आहे.

या प्रकल्पांचे काम एमआयडीसीकडून केले जाणार होते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाला या प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यास सांगण्यात आले. नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने यास नकार देऊन एमआयडीसीनेच भूसंपादन करावे आणि प्रकल्पांचे कामही करावे, अशी सूचना केली. यावर उच्चस्तरीय पातळीवर चर्चा होऊन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर (पीएमआरडीए) ही जबाबदारी सोपविण्यात आली. पीएमआरडीएने विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) देऊन हे भूसंपादन करावे, असा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर पुन्हा भूसंपादनाचा चेंडू एकमेकांकडे टोलविण्यात आला. आता सध्या या प्रकल्पासांठी भूसंपादन कोण करणार हेच निश्चित नसल्याचे समोर आले आहे. यासाठी प्रत्येक सरकारी विभाग एकमेकांकडे बोट दाखवित आहे.

### उद्योगमंत्री सामंतही अनभिज्ञ

उद्योगमंत्री उदय सामंत हेही या भूसंपादनाच्या एकूण गोंधळाबाबत अनभिज्ञ आहेत. त्यांनी या प्रकल्पांचे भूसंपादन सार्वजनिक बांधकाम विभाग करेल, असे नुकतेच सांगितले. वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. विविध सरकारी विभागांमध्ये भूसंपादनाबाबत अनेक बैठका झाल्या आहेत. याबाबत सातत्याने पत्रव्यवहारही सुरू आहे. परंतु, वरिष्ठ पातळीवरून धोरणात्मक निर्णय होत नसल्याने या विभागांना निर्णय घेत नसल्याने धोरण लकवा निर्माण झाला आहे.

# जम्मू-काश्मीर भारताचेच!



## भूमिका

**आंतरराष्ट्रीय राजकारणात काय बोलले जाते, यापेक्षा ते कोण बोलते याला अधिक महत्त्व असते. त्यामुळे अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर यांनी जम्मू-काश्मीरला दिलेल्या भेटीदरम्यान केलेले विधान निश्चितच महत्त्वाचे ठरते. "जम्मू-काश्मीर हा भारताचा महत्त्वाचा भाग आहे," असे गोर यांनी स्पष्टपणे म्हटले. त्यांच्या या विधानाचे स्वागत केले पाहिजे.**

विशेष म्हणजे, हे विधान केवळ औपचारिक कार्यक्रमात केलेले नसून जम्मू-काश्मीरच्या प्रत्यक्ष दौऱ्यात करण्यात आले आहे. गोर यांनी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेतली आणि केंद्र व जम्मू-काश्मीर प्रशासनाने सुरक्षा परिस्थिती सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचेही कौतुक केले. अमेरिकेने जम्मू-काश्मीरसाठी जारी केलेल्या प्रवासविषयक इशाऱ्याचा फेरविचार करण्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत.


या विधानाचे महत्त्व यासाठी अधिक आहे की, काश्मीर प्रश्नावर अमेरिकेची भूमिका नेहमीच भारताच्या अपेक्षेप्रमाणे राहिलेली नाही. भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये अमेरिका अनेकदा 'दोन्ही बाजूंनी संवाद साधावा' या भूमिकेत राहिली आहे. त्यामुळे अमेरिकेच्या विद्यमान राजदूताने जम्मू-काश्मीरला भारताचा महत्त्वाचा भाग म्हणून संबोधणे हा राजनैतिकदृष्ट्या लक्षवेधी बदल मानावा लागेल.

पाकिस्तानची प्रतिक्रिया त्याचे महत्त्व अधोरेखित करणारीच आहे. गोर यांच्या विधानानंतर पाकिस्तानने इस्लामाबादमधील अमेरिकेच्या कार्यवाहक राजनैतिक अधिकाऱ्याला पाचारण करून तीव्र निषेध नोंदवला. पाकिस्तानने जम्मू-काश्मीरला वादग्रस्त प्रदेश असल्याचा दावा पुन्हा मांडला.

मात्र, येथे एक गोष्ट स्पष्ट असली पाहिजे. अमेरिकेच्या राजदूताने एखादे विधान केले म्हणून जम्मू-काश्मीर भारताचा आहे किंवा नाही, हे ठरत नाही. भारताची सार्वभौमता कोणत्याही परदेशी मान्यतेवर अवलंबून नाही. जम्मू-काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे, ही भारताची भूमिका स्पष्ट आणि सातत्यपूर्ण आहे. त्यामुळे या विधानाचा अतिरेक करून त्याला भारताच्या सार्वभौमत्वाचा आधार मानणेही योग्य ठरणार नाही.

तरीही आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा विधानांचे महत्त्व नाकारता येत नाही. कारण काश्मीर प्रश्नावर भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणत्या प्रकारचे राजनैतिक वातावरण मिळत आहे, याचे संकेत अशा वक्तव्यांतून मिळतात. २०१९ मध्ये अनुच्छेद ३७० निष्प्रभ केल्यानंतर अमेरिकेच्या राजदूताचा जम्मू-काश्मीरमधील हा महत्त्वपूर्ण दौरा आहे. त्यामुळे त्याचे प्रतीकात्मक महत्त्वही मोठे आहे.

या पार्श्वभूमीवर मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर टीका करणाऱ्यांनीही या घडामोडीकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याची गरज आहे. परराष्ट्र धोरणाचे यश केवळ भाषणांमध्ये किंवा नेत्यांच्या परदेश दौऱ्यांमध्ये मोजता येत नाही. भारताच्या हितासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण होणारे संबंध, धोरणात्मक भागीदारी आणि बदलणारी राजनैतिक भूमिका हे त्याचे खरे मापदंड आहेत.



मात्र, अमेरिकेची भूमिका बदलली म्हणून पाकिस्तानकडून काश्मीरबाबतच्या कुरापती थांबतील, असे समजण्याचे कारण नाही. भारताने आपल्या सार्वभौमत्वाच्या संरक्षणासाठी सदैव सज्ज राहिले पाहिजे. कूटनीतीसोबत संरक्षणक्षमता आणि राष्ट्रीय हिताबाबतची ठाम भूमिका तितकीच आवश्यक आहे.

जम्मू-काश्मीर भारताचेच आहे, हे भारताला कोणत्याही बाह्य प्रमाणपत्राची गरज नाही. पण जगातील एक प्रभावशाली सत्ता तेच वास्तव आपल्या शब्दांत व्यक्त करत असेल, तर त्याचे स्वागत करण्यास हरकत नसावी. अमेरिकेच्या भूमिकेतील हा बदल कायमस्वरूपी ठरला, तर तो भारताच्या सातत्यपूर्ण आणि दीर्घकालीन परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने निश्चितच सकारात्मक संकेत मानावा लागेल.

## प्रासंगिक »

### माकडाचे काळीज

**एका सरोवरात एक सुसर राहत होती. सरोवराच्या काठावर एक झाड होते. त्या झाडावर एक माकड राहत होते. सुसरीला पोहताना पाहून, माकडाला सरोवरात फिरावे असे वाटे.**

सुसरीला माकडे छान छान फळे खाताना पाहून फळे खावीशी वाटे. हळूहळू त्या दोघांची मैत्री झाली. माकड सुसरीला म्हणाले, "सुसरताई मला सरोवरात फिरवून आणशील का ?" सुसर म्हणाली, "हो! बस माझ्या पाठीवर." टुणकन उडी मारून माकड सुसरीच्या पाठीवर बसले.

सुसर माकडास घेऊन फिरावयास निघाली. सुसरीच्या मनात विचार आला, हे माकड रोज गोड-गोड फळे खाते, तर ह्याचे काळीज किती गोड असेल! सुसरीने माकडास विचारले, "तू मला तुझे काळीज देशील का?" माकड सावध झाले आणि म्हणाले, "मला आधी का नाही विचारलेस, मी तर काळीज झाडावरच ठेऊन आलो. चल, मला किनाऱ्यावर सोड म्हणजे तुला काळीज काढून देतो." सुसर त्याला घेऊन किनाऱ्यापाशी आली. माकडाने टुणकन उडी मारली आणि झाडावर चढून बसले. सुसर बिचारी काळीज मिळण्याची वाट पहात राहिली.

- तात्पर्य : मैत्री करताना सावध रहावे.

भारताच्या वास्तविक सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा अंदाज मे महिन्यातील 6.7 टक्क्यांवरून 10 बेसिस पॉइंट्सने वाढवून आर्थिक वर्ष 2026-27 साठी 6.8 टक्के राहणार असल्याचा अंदाज इंडिया रेटिंग्स अँड रिसर्चने मांडला आहे. याचे कारण म्हणजे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती अपेक्षेपेक्षा कमी असण्याचे आहे.

# जेडीपी वाढीचा अंदाज 6.8 टक्कं राहणार




दरम्यान, रेटिंग एजन्सीने इशारा दिला आहे की, एल निनो ट्रेंड आणि भू-राजकीय आव्हानांमुळे वाढ काहीशी संथ राहू शकते. यामुळे एजन्सीने भारताचा वाढीचा अंदाज राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या 7.6 टक्क्यांच्या तात्पुरत्या अंदाजापेक्षा खूपच कमी ठेवला आहे.

एजन्सीने आपल्या 'मिड-इयर इकॉनॉमिक आउटलूक रिपोर्ट'मध्ये म्हटले आहे की, 'आर्थिक वर्ष 2020 मधील जीडीपी वाढीस असलेल्या धोक्यांमध्ये भू-राजकीय घडामोडी (विशेषत: पश्चिम आशियातील न सुटलेले संघर्ष), वाढती एकूण महागाई, चलनाचे अवमूल्यन, अपेक्षेपेक्षा कमी जागतिक पतवाढ, आर्थिक वर्ष 2026 मधील अधिक मजबूत जीडीपी वाढ (बेस इफेक्ट) आणि विशेषत: एल निनोचे हंगामी कल यांचा समावेश आहे.

रशियन कच्चे तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर 100 टक्के शुल्क लावण्याच्या अमेरिकन सरकारच्या अलीकडील घोषणेचाही यात समावेश आहे. 'इंद्रा-आरएचे मुख्य अर्थतज्ञ देवेंद्र पंत यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, 'या सकारात्मक बदलाचे कारण कच्च्या तेलाच्या किमतींमधील घट आहे.' तथापि, मान्सूनशी संबंधित घटकांनी हा फायदा कमी केला आहे.'

एजन्सीने हंगामी धोके, विशेषत: एल निनोशी संबंधित धोके, हे भारताच्या कृषी उत्पादन आणि एकूण ग्राहक मूल्यांपुढील एक मूलभूत आव्हान असल्याचे ओळखले आहे. ते म्हणाले, 'कमकुवत मान्सूनमुळे अन्न आणि पेयांच्या किमती आणि ग्राहक किंमत महागाईवर आधीच परिणाम झाला आहे.' प्रतिकूल आधारभूत परिणामामुळे ऑक्टोबर 2026 पर्यंत अन्नधान्य महागाई वाढू शकते. इंद्रा रेटिंग्जनुसार, आर्थिक वर्ष 2027 मध्ये कृषी जीव्हीए वाढ 3 टक्क्यांवरून 2 टक्क्यांपर्यंत मंदावेल.

## ।। अभंगवाणी ।।



अल्प ते आयुष्य धन कळीं ।
मर्यादा हे केली संतजनीं ॥१॥

जनमय प्राण न घडें साधन ।
नोहे तीर्थाटन व्रत तप ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यात वीजचोरांचा सुळसुळाट!

## कोकणात अव्वल, तर पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगरमध्येही धक्कादायक ‘आकडे’

**महाईन्यूज । पुणे**

**वीजचोरीविरोधात महावितरणकडून धडक मोहीमेद्वारे कारवाई करण्यात येत असून, गेल्या चार महिन्यांमध्ये १९ हजार ५९९ ठिकाणी वीजचोरीचे प्रकार उघडकीस आले आहेत. आतापर्यंत ६ हजार ६२९ वीजचोरांकडून १४ कोटी १२ लाख रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.**



महावितरणच्या कोकण विभागात वीजचोरीचे सर्वाधिक प्रकार सापडले असून, विभागांतील ७ हजार ४९६ वीज ग्राहकांवर कारवाई करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात ४ हजार ५९७, नागपूर विभागात ४ हजार ५२१ आणि पुण्यात सर्वांत कमी २ हजार ९८५ वीजचोरीचे प्रकार सापडले आहेत.

महावितरणकडून धडक मोहिमेद्वारे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीजजोडण्यांची तपासणी करण्यात येत आहे. एप्रिल महिन्यापासून या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. एप्रिल ते जूनपर्यंत ८ हजार ५६७ वीजचोरीचे प्रकार सापडले, तर केवळ जुलै महिन्यातील कारवाईत ११ हजार ०३२ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. गेल्या चार महिन्यांतील १५ हजार ९६५ वीजचोऱ्यांचे मूल्यांकन झाले असून, ३० कोटी ३६ लाख रुपयांच्या वीजचोरीचे देयक संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. उर्वरित ३ हजार ६३४ प्रकरणांचे मूल्यांकन सुरु आहे. तसेच वीजचोरीच्या सर्वच प्रकरणांमध्ये तडजोड शुल्काच्या दंडाची रक्कमही आकारण्यात येत असून, ४ हजार ९५९ प्रकरणांमध्ये १ कोटी ८५ लाखांचे तडजोड शुल्क आकारण्यात आल्याचेही महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा दंडासह भरणा केला नाही, तर संबंधित वीजचोरांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येत असल्याचेही महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. थकबाकीदारांनी अन्य ठिकाणाहून वीजवापर केल्याचे आढळून आल्यास वीजचोरीची कारवाई करण्याचा इशाराही कंपनीकडून देण्यात आला आहे.

### मागील चार महिन्यांतील वीजचोरी

(महाविरणच्या विभागांनुसार)
कोकण – ७ हजार ४९६
छत्रपती संभाजीनगर – ४ हजार ५९७
नागपूर – ४ हजार ५२१
पुणे – २ हजार ९८५
एकूण – १९ हजार ५९९

### जुलै महिन्यातील वीजचोरी

कोकण – ४ हजार ०८४
छत्रपती संभाजीनगर – २ हजार ३६५
नागपूर – २ हजार ३२४
पुणे – २ हजार २५९
एकूण – ११ हजार ०३२

# मंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडून अधिकाऱ्यांची कानउघडणी

**महाईन्यूज । अहिल्यानगर**

**नगरच्या औद्योगिक क्षेत्रात गुंडाराज चालू आहे, अतिक्रमणे झाली आहेत, रस्ते व पाणीपुरवठ्याची अवस्था काय आहे? गॅस वाहिन्यांचे काम का रखडले आहे?, त्यामुळे केवळ गुंतवणूक परिषद घेऊन उपयोग नाही तर उद्योजकांच्या गुंतवणुकीला सुरक्षा मिळायला हवी. अधिकारी त्यासाठी काय करतात? एमआयडीसीचा उपअभियंता साहेब होऊन बसला आहे, अतिक्रमणे करणारे तुमचे जावई आहेत का? अशा शब्दात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी उद्योग विभाग व औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांची आज, शनिवारी कानउघडणी केली.**



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी पालकमंत्री विखे बोलत होते. आमदार काशिनाथ दाते, उद्योग विभागाच्या सहआयुक्त वृषाली सोने, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, जिल्हा उद्योग अधिकारी अशोक बेनके यांच्यासह उद्योजक अरविंद पारगावकर, प्रकाश गांधी, बाबासाहेब काळे, गिरधर असणे, प्रकाश भामरे, भाजपचे पदाधिकारी विनायक देशमुख, अनिल मोहिते, दिलीप भालसिंग आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे म्हणाले, श्रीरामपूर, घोडेगावमध्ये गुंतवणूकदार येत नाहीत, त्याची कारणे काय आहेत? वातावरण निर्मिती करायला हवी. सुपा औद्योगिक क्षेत्रात उद्योग येत आहेत, मात्र तेथे सुरक्षा मिळत नाही. एमआयडीसी तेथे लक्ष देत नाही. अशांत वातावरणात अधिकाऱ्यांनी ठामपणे उभे राहिले पाहिजे तर गुंतवणूकदारात विश्वास निर्माण होईल. सुपामध्ये येऊन येणारे काहीजण परत गेले. याबद्दल आत्मचिंतन केले पाहिजे.

नगरच्या औद्योगिक क्षेत्रात गुंडाराज सुरू आहे. सर्वत्र टपऱ्या झाल्या आहेत. हे वातावरण बदलावे लागेल. एमआयडीसीने त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. केवळ परिषदा घेऊन उपयोग होणार नाही. वातावरण निर्मिती करायला हवी. रस्ते आणि पाणीपुरवठ्याची काय अवस्था आहे, एमआयडीसीचा उपअभियंता साहेब होऊन बसला आहे. गॅसवाहिन्यांचे काम रखडले आहे, अतिक्रमणे काढायला हवीत, ते कोणी तुमची जावई आहेत का? डबर, खडी, लेबर आमच्याकडूनच घेतले पाहिजे असे उद्योजकांकडे सांगितले जात आहे. एमआयडीसी स्वतंत्र नियोजन प्राधिकरण असताना ग्रामपंचायतीचा हस्तक्षेप कशासाठी हवा आहे, असाही प्रश्न विखे यांनी उपस्थित केला. नगरच्या औद्योगिक क्षेत्राच्या विस्तारीकरणासाठी ६०० हेक्टर जागा उपलब्ध केली, मात्र तो वाद न्यायालयात गेला आहे. के. के. रेंजला दिलेली १० हजार हेक्टर जमीन लष्कर वापरत नाही त्याऐवजी मध्य प्रदेशमध्ये लष्कराला जागा देऊ केली, मात्र लष्कर नगरची जागा सोडायला तयार नाही. हरेगाव मळा येथे संरक्षण साहित्य निर्मितीसाठी १५०० व डीआरडीओच्या प्रयोगशाळेसाठी १५०० एकर जमीन उपलब्ध करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

उद्योग विभागाच्या सहआयुक्त वृषाली सोने यांनी प्रास्ताविक केले. उद्योजक अरविंद पारगावकर, अद्विक ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी मायकल यांची भाषणे झाली. सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांचा गौरव करण्यात आला.

### ८३ कंपन्यांचे करार

नगर जिल्ह्यात ८३ गुंतवणूकदारांनी १३ हजार १७३ कोटी रुपये गुंतवणुकीचे करार केले आहेत. त्यामधून ११ हजार ९४८ तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती सहआयुक्त वृषाली सोने यांनी दिली. यामधील १० हजार कोटी रुपये गुंतवणूक करून निंबे उद्योग समूहाचा संरक्षण साहित्य निर्मिती उद्योग शिर्डीमध्ये यापूर्वीच सुरू झाला आहे. मैत्री- २ पोर्टलच्या माध्यमातून सूक्ष्म व लघुउद्योजकांना गुंतवणुकीत प्राधान्य दिले जात आहे. एकाच छताखाली १७६ सेवा उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला इशारा

## ‘होर्मुझ आमचा प्रदेश’ ट्रम्प ; तेहरानकडून ‘विध्वंसक’ प्रत्युत्तराची धमकी

**महाईन्यूज** | इराण

**अमेरिका आणि इराणमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीवर अमेरिकेचे पूर्ण नियंत्रण असल्याचा दावा करत इराणला इशारा दिला आहे. त्याचवेळी इराणच्या सशस्त्र दलांनी अमेरिकेकडून नव्या धमक्या दिल्यास त्याला विध्वंसक प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा दिला आहे.**



अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी इराणविरोधात “इतिहासातील सर्वात कठोर निर्बंध” लागू करण्याची घोषणा सोमवारी केली जाईल, असे सांगितले. ट्रम्प यांनी इराणला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा आधार देणाऱ्या देशांवरही आर्थिक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

ट्रम्प यांनी शुक्रवारी इराणबरोबर योग्य करार करण्यासाठी ते अजून तयार नसल्याचे सांगितले. अमेरिकेकडे होर्मुझ सामुद्रधुनीच्या संपूर्ण परिसरावर नियंत्रण असल्याचा दावा करत ते म्हणाले की, “मी होर्मुझ सामुद्रधुनीला सध्या अमेरिकेचा प्रदेश मानतो.”

इराणला अण्वस्त्र मिळू देणार नसल्याचेही ट्रम्प यांनी पुन्हा स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, इराणने योग्य करार केला नाही तर अमेरिकेकडून पुढील कठोर पावले उचलली जाऊ शकतात.

दरम्यान, अमेरिकेचे अर्थमंत्री बेसेंट यांनी आर्थिक दबाव वाढवण्याचे संकेत दिले. “आमच्याकडे नाकेबंदी आहे आणि आता इतिहासातील सर्वात कठोर निर्बंध असतील,” असे त्यांनी म्हटले.

अमेरिकेच्या धमक्यांना इराणनेही प्रतिक्रिया दिली आहे. इराणच्या सशस्त्र दलांचे चीफ ऑफ स्टाफ मेजर जनरल अली अब्दुल्लाही यांनी जमीन, समुद्र, हवाई क्षेत्र, हवाई संरक्षण आणि सायबर क्षेत्रात प्रत्युत्तर देण्यासाठी इराण सज्ज असल्याचे सांगितले.

अमेरिकेकडून नव्या धमक्या दिल्यास इराणकडून अत्यंत कठोर, शिक्षा देणाऱ्या आणि विनाशकारी प्रतियुत्तरे दिली जातील, असा इशारा इराणी माध्यमांनी त्यांच्या हवाल्याने दिला.

या युद्धाकाळात इराणच्या अर्थव्यवस्थेचे आणि पारंपरिक लष्करी क्षमतेचे मोठे नुकसान झाले असले, तरीही त्यांच्याकडे क्षेपणास्त्र आणि ड्रोनच्या अशा क्षमता कायम आहेत ज्यांमुळे ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’मधून होणाऱ्या तेल टँकर्सच्या वाहतुकीला आणि प्रादेशिक लक्ष्यांना धोका निर्माण होऊ शकतो. या युद्धामुळे इराणच्या अर्थव्यवस्थेवर मोठा दबाव आला असला तरी देशाकडे क्षेपणास्त्र आणि ड्रोन क्षमता कायम आहे. त्यामुळे होर्मुझमधील तेलवाहतूक आणि प्रादेशिक लक्ष्यांवर धोका कायम असल्याचे मानले जात आहे.

अमेरिकेच्या नव्या निर्बंधांच्या घोषणेमुळे शुक्रवारी तेलाच्या किमती वाढल्या. ब्रेंट क्रूड ९४.३९ डॉलर प्रति बॅरल, तर अमेरिकेतील वेस्ट टेक्सास इंटरमीजिएटचा क्रूडचा भाव ८७.०६ डॉलर प्रति बॅरलवर स्थिरावला.

होर्मुझ सामुद्रधुनी या युद्धातील सर्वात महत्त्वाच्या केंद्रांपैकी एक बनली आहे. युद्धापूर्वी जगातील सुमारे पाचवा हिस्सा तेल व्यापार या मार्गातून होत होता. मात्र युद्धानंतर या मार्गावरील जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणात घटली आहे.

सध्या इराण आणि ओमानकडून होर्मुझमधील जहाजांची वाहतूक पूर्ववत करण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न सुरू आहेत. दुसरीकडे, तर जहाजांवर टोल लादण्यावर अमेरिकेने विरोध दर्शविला आहे.

### चीनला अमेरिकेचा इशारा

इराणवरील आर्थिक दबाव वाढवताना अमेरिकेने त्याला आर्थिक मदत करणाऱ्या देशांनाही इशारा दिला आहे. मात्र इराणचा सर्वात मोठा समुद्रमार्गे तेल खरेदीदार असलेल्या चीनने अमेरिकेला विरोध केला आहे. चीनच्या वॉशिंग्टनमधील दूतावासाने निर्बंध आणि दबावामुळे समस्या सुटणार नसल्याचे म्हटले आहे. २०२५ मध्ये इराणच्या समुद्रमार्गे निर्यात झालेल्या तेलापैकी ८० टक्क्यांहून अधिक तेल चीनमध्ये गेल्याचे केप्लरच्या आकडेवारीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अशा परिस्थितीत अमेरिका आर्थिक निर्बंधांचा दबाव वाढवत आहे, तर इराण लष्करी प्रत्युत्तराचा इशारा देत आहे. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील परिस्थिती आणि त्याचा जागतिक तेलपुरवठ्यावर होणारा परिणाम येणाऱ्या काळात महत्त्वाचा ठरणार आहे.

# ‘वंदे मातरम’वरून राजकारण तापलं! भाजपाकडून विशेष ठराव संमत

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**काँग्रेसने राष्ट्रगीत असलेल्या वंदे मातरम् चे गायन केवळ पहिल्या दोन कडव्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या घेतलेल्या निर्णयाचा भारतीय जनता पक्षाने (भाजप) शनिवारी निषेध केला असून, “संपूर्ण वंदे मातरम् चा मान, सन्मान, वारसा आणि राष्ट्रीय दर्जा” जपण्याचा ठराव मंजूर केला आहे. जंतरमंतर येथील आंदोलनादरम्यान दिल्लीतील एका विद्यार्थ्यावर झालेल्या पेलेट गन हल्ल्याप्रकरणी एफआयआर (FIR) नोंदवण्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने संसद मार्ग पोलीस ठाण्यात धरणे आंदोलन करून सत्ताधारी भाजपाविरुद्ध आक्रमक भूमिका घेतल्याच्या एका दिवसानंतर भाजपाचा हा ठराव आला आहे.**




आपल्या नवीन संघटनात्मक टीमच्या पहिल्या फेरीच्या चर्चेनंतर एक्सवरील एका पोस्टमध्ये भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन म्हणाले, “भारतीय जनता पक्ष वंदे मातरम् ला भारताचे राष्ट्रगीत, भारतमातेबद्दलच्या आदराची अभिव्यक्ती, स्वातंत्र्यलढ्याचा मंत्र आणि भारताच्या राष्ट्रीय चेतनेचे एक अमर प्रतीक मानतो. १९ ऑगस्ट २०२६ रोजी काँग्रेस कार्य समितीने (CWC) आपला १९३७ चा ठराव पुन्हा लागू करून काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम् चे गायन केवळ पहिल्या दोन कडव्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या घेतलेल्या निर्णयाचा भाजपा तीव्र निषेध आणि स्पष्ट विरोध करतो.”

प्रमुख विरोधी पक्षावर हल्लाबोल करत भाजपाने “राष्ट्रगीताला जातीय दबावापुढे, राजकीय लांगूलचालनापुढे किंवा संकुचित मतपेढीच्या विचारांच्या अधीन करण्याचे सर्व प्रयत्न फेटाळण्याचा संकल्पही केला. भाजपा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून “वंदे मातरम् चा इतिहास, अर्थ, राष्ट्रीय महत्त्व आणि गौरवशाली वारसा भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी देशभरात मोहीम राबवणार असल्याचं नितीन नबीन यांनी जाहीर केलं. भाजपा खासदाराने प्रत्येक नागरिकाला हे लक्षात ठेवण्याचं आवाहन केलं की, ‘वंदे मातरम्’ हे शब्द “एकेकाळी एका बलाढ्य साम्राज्याला घाबरवण्यासाठी पुरेसे शक्तिशाली होते आणि भारतीय पिढ्यांनी स्वातंत्र्य, त्याग आणि राष्ट्रीय अभिमानाचा मंत्र म्हणून ते आत्मसात केले होते.

ते पुढे म्हणाले की, हा केवळ एखाद्या राजकीय पक्षाशी संबंधित विषय नाही तर भारताचा सन्मान आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य देशभक्तांच्या वारशाशी संबंधित आहे. “तो वारसा समकालीन मतपेढीच्या राजकारणाच्या हिशोबापुरता मर्यादित केला जाऊ शकत नाही. १९४७ मध्ये स्वातंत्र्याची हाक म्हणून घुमलेले ‘वंदे मातरम्’ हेच गीत माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ‘विकसित भारत@ २०४७’ चा सर्वोच्च मंत्र म्हणून पुन्हा गुंजेल”, असं नवीन यांनी शेवटी म्हटलं आहे.

# मोनालिसाच्या नव्या लूकची सोशल मीडियावर चर्चा



भोजपुरी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री मोनालिसा सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असते. ती तिचे फोटो आणि व्हिडीओ चाहत्यांसोबत शेअर करत असते. तिच्या प्रत्येक नव्या पोस्टची सोशल मीडियावर चर्चा होताना दिसते. आता पुन्हा एकदा मोनालिसाने तिच्या नव्या लूकमधील काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचा हटके अंदाज पाहायला मिळत असून, तिच्या टॅटूनेही चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मोनालिसाने शेअर केलेल्या फोटोंमध्ये ती वेस्टर्न शॉर्ट ड्रेसमध्ये दिसत आहे. या लूकसोबत तिने हलकी ज्वेलरी आणि मोकळे केस असा साधा पण आकर्षक लूक केला आहे. विशेष म्हणजे तिच्या ड्रेसमधून दिसणारा टॅटू चाहत्यांच्या लक्षात आला. त्यामुळे सोशल मीडियावर तिच्या या नव्या लूकची चांगलीच चर्चा रंगली आहे. मोनालिसाने इन्स्टाग्रामवर या फोटोशूटमधील अनेक फोटो शेअर केले आहेत. वेगवेगळ्या पोझ देत तिने फोटो काढले आहेत. फोटो शेअर करताना अभिनेत्रीने सांगितले की, हे फोटो आधी शेअर करायचे राहून गेले होते. फोटो काढताना तिला तिथली लाइटिंग खूप आवडली होती. मिळालेल्या माहितीनुसार, मोनालिसा नुकतीच एका कार्यक्रमाला उपस्थित राहिली होती. त्यावेळी तिने हा खास ड्रेस परिधान केला होता. कार्यक्रमानंतर तिने या लूकमधील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले. मोनालिसाच्या या फोटोंवर चाहत्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी तिच्या लूकचे कौतुक केले आहे. काही चाहत्यांनी तिला सुंदर आणि स्टायलिश असल्याचे म्हटले आहे. तिच्या टॅटूनेही नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. मोनालिसा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असून, तिच्या पोस्टला चाहत्यांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. ती आपल्या कामासोबतच फोटो आणि व्हिडीओच्या माध्यमातून चाहत्यांच्या संपर्कात राहते. मोनालिसा तिच्या फिटनेससाठीही ओळखली जाते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ती फिटनेससाठी नियमित व्यायाम करते. आपल्या कामाच्या व्यस्त वेळापत्रकातूनही ती फिटनेसकडे लक्ष देते. त्यामुळे तिच्या नव्या लूकसोबतच तिच्या फिटनेसचीही चर्चा सोशल मीडियावर होत असते. मोनालिसाचे फोटो पाहून चाहत्यांनी तिच्या स्टाइलचे कौतुक केले आहे. तिचा हा लूक कार्यक्रमासाठी खास तयार करण्यात आला होता. त्यामुळे तिच्या चाहत्यांना तिचा हा अंदाज आवडल्याचे सोशल मीडिया प्रतिक्रियांवरून दिसून येत आहे. दरम्यान, कामाच्या आघाडीवरही मोनालिसा सध्या चर्चेत आहे. ती मिनी टीव्ही सीरिज 'लव्ह टू हेट यू चॅप्टर २'मध्ये महत्त्वाची भूमिका साकारत आहे. ही सीरिज ४ ऑगस्टपासून ऑॅलराइट टीव्ही ॲपवर स्ट्रीम होत आहे. या सीरिजचे नवीन एपिसोड दर मंगळवार, गुरुवार आणि शनिवार प्रदर्शित होत आहेत. मोनालिसासोबत नियती फतनानी, हर्ष राजपूत आणि अभिमन्यू तोमर हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसत आहेत. मोनालिसाच्या नव्या लूकपासून ते तिच्या आगामी प्रोजेक्ट्सपर्यंत, अभिनेत्री सध्या चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. तिच्या नव्या फोटोंना मिळालेला प्रतिसाद पाहता, सोशल मीडियावर तिची लोकप्रियता कायम असल्याचे दिसून येते.



# बाबा निरालाचा नवा खेळ!

आश्रम या लोकप्रिय वेबसिरीजच्या तिसऱ्या सीझनला यश मिळाल्यानंतर दिग्दर्शक प्रकाश झाँ यांनी चौथ्या सीझनची घोषणा केली होती. आता या सीझन संदर्भात एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. या वेबसिरीजचे दिग्दर्शक आणि निर्माते प्रकाश झाँ यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत चौथ्या सीझनच्या चित्रीकरणाला सुरुवात झाल्याची माहिती दिली आहे. 'आश्रम ४' ची घोषणा करताना सोशल मीडियावरील इन्स्टाग्राम पोस्टमध्ये एक फोटो शेअर करण्यात आला आहे. त्यामध्ये एक मूव्ही क्लिपबोर्ड दिसत असून, त्यावर 'एक बदनाम आश्रम' असे लिहिलेले आहे. हा फोटो शेअर करताना प्रकाश झाँ यांच्या प्रोडक्शन हाऊसने कॅप्शनमध्ये लिहिले आहे, "आणखी एक सुरुवात. आश्रमाच्या एका नवीन अध्यायात आपले स्वागत आहे. आश्रम ४ चे चित्रीकरण सुरू आहे." 'आश्रम' (सीझन १) २०२० मध्ये, 'आश्रम चॅप्टर २' (सीझन २) २०२० मध्ये आणि 'आश्रम ३' (सीझन ३) २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. या तिन्ही सीझन्सला प्रेक्षकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळाला. आता चौथ्या सीझनच्या चित्रीकरणाला सुरूवात झाली असून, हा सीझन कधीपर्यंत प्रेक्षकांच्या भेटीला येणार याबाबत माहिती समोर आलेली नाही. 'आश्रम' ही एक लोकप्रिय हिंदी क्राईम-ड्रामा वेबसिरीज आहे. याची कथा धार्मिक बुरखा घेऊन लोकांना अंद्धश्रद्धेच्या जाळ्यात ओढणाऱ्या ढोंगीबाबाची आहे. यात दाखवण्यात आलेल्या घटनांमुळे ही सिरीज खिळवून ठेवणारा अनुभव देते. 'आश्रम'मध्ये बॉबी देओल, अदिती पोहनकर आणि चंदन रॉय सन्याल मुख्य भूमिकेत आहेत. तसेच तुषार पांडे, दर्शन कुमार, अनुपप्रिया गोएंका, त्रिधा चौधरी आणि विक्रम कोचर या कलाकारांच्या भूमिका देखील महत्वाच्या आहेत.



# फुटबॉल विश्वात मोठी खळबळ..!

## भर मैदानात लिओनेल मेस्सीने प्रतिस्पर्धी खेळाडूला लगावली कानशिलात, VIDEO व्हायरल

**महाईन्यूज । लंडन**

**फुटबॉल जगतातील दिग्गज स्टार लिओनेल मेस्सीला (Lionel Messi) मेजर लीग सॉकर (MLS) स्पर्धेत मोठा दणका बसला आहे. फिलाडेल्फिया युनियनविरुद्धच्या हाय-व्होल्टेज सामन्यादरम्यान प्रतिस्पर्धी खेळाडू क्विन सुलिव्हनसोबत (Quinn Sullivan) झालेल्या वादावादी आणि कानशिलात लगावल्यामुळे लीगने मेस्सीवर आर्थिक दंड ठोठावला आहे. या दंडाच्या रकमेचा अधिकृत खुलासा करण्यात आलेला नसला तरी, थेट मेस्सीवरच कारवाई झाल्याने फुटबॉल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**




केवळ मेस्सीच नाही, तर इंटर मियामीचा डिफेंडर इयान फ्रे याच्यावरही सुलिव्हनची मान पकडल्याप्रकरणी दंड ठोठावण्यात आला आहे. दरम्यान, सामन्याच्या शेवटच्या क्षणी मैदानावरील हाणामारीमुळे मियामीच्या यानिक ब्राईट आणि फिलाडेल्फियाच्या कावन सुलिव्हन यांना पंचांनी थेट रेड कार्ड दाखवले होते. मात्र, फिलाडेल्फियाच्या अपिलनंतर एमएलएस तपास समितीने एकमताने कावन सुलिव्हनचे रेड कार्ड आणि एका सामन्याची बंदी रद्द केली असून त्याला पुढील सामन्यात खेळण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

`एमएलएसच्या या सखोल चौकशीनंतर इंटर मियामीचे स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी आणि इयान फ्रे हे सामन्यांच्या बंदीपासून (Match Ban) थोडक्यात बचावले आहेत, मात्र दोघांनाही आर्थिक दंडाचा सामना करावा लागला आहे. याव्यतिरिक्त, मिनेसोटा युनायटेडच्या अँटोनी मारकनिचवर खोट्या फाऊलचे नाटक (Simulation) केल्याबद्दल लीगने स्वतंत्र दंड ठोठावला आहे.

फुटबॉलचा महान खेळाडू आणि इंटर मियामीचा स्टार लिओनेल मेस्सी याच्यावर मेजर लीग सॉकरने (MLS) कारवाई केली आहे. फिलाडेल्फिया युनियनविरुद्धच्या सामन्यात प्रतिस्पर्धी खेळाडू क्विन सुलिव्हनसोबत झालेल्या शारीरिक वादानंतर मेस्सीला आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे. मात्र, MLSने दंडाची नेमकी रक्कम जाहीर केलेली नाही.

इंटर मियामी आणि फिलाडेल्फिया युनियन यांच्यात १९ ऑगस्ट रोजी झालेला सामना २-२ असा बरोबरीत सुटला. सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात मैदानावर दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये तणाव निर्माण झाला. याचदरम्यान मेस्सी आणि फिलाडेल्फियाचा मिडफिल्डर क्विन सुलिव्हन यांच्यात शाब्दिक वाद झाला. या वादाचे रूपांतर शारीरिक चकमकीत झाले.

### मेस्सीने तोडला कडक नियम!

सामन्याच्या एक्स्ट्रा टाईममध्ये मैदानावर मेस्सी आणि सुलिव्हन यांच्यात जोरदार खडाजंगी झाली होती. या वादादरम्यान मेस्सीने सुलिव्हनच्या कानशिलात लगावल्याचे स्पष्ट दिसले. मैदानावर पंचांच्या ही बाब लक्षात आली नसली तरी, नंतर व्हिडिओ फुटेज तपासल्यानंतर शिस्तपालन समितीने मेस्सी दोषी आढळल्याचे स्पष्ट केले. प्रतिस्पर्धी खेळाडूच्या तोंडावर, डोक्यावर किंवा मानेवर हात न लावण्याच्या लीगच्या नियमाचे मेस्सीने उल्लंघन केले आहे. मेस्सीवर या नियमांतर्गत झालेली ही दुसरी कारवाई आहे; यापूर्वी फेब्रुवारी २०२५ मध्येही त्याच्यावर असाच दंड लागला होता.

## स्पेनने मोडला ऑस्ट्रेलियाचा सर्वात मोठा रेकॉर्ड! जगातील पहिलाच क्रिकेट संघ

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**महिला दिल्ली प्रीमियर लीग 2026 मध्ये एका अनोख्या सेलिब्रेशनने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सध्या '6-7' हा ट्रेंड विशेषतः Gen Z आणि Gen Alpha मध्ये लोकप्रिय आहे. दिल्लीची युवा क्रिकेटपटू मेधावी बिधुरी हिने विकेट घेतल्यानंतर केलेल्या '6-7' सेलिब्रेशनचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, तिची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.**







20 ऑगस्ट रोजी सेंट्रल दिल्ली क्वीन्स आणि साऊथ दिल्ली सुपरस्टार्झ यांच्यातील सामन्यात हा प्रसंग घडला. डावाच्या 16व्या षटकात मेधावीने निशिका सिंगला बाद केले. मिडविकेटवर अरुषी गोयलने शानदार डाईव्ह मारत झेल घेतला. विकेट मिळताच मेधावीने दोन्ही हात वर-खाली करत खास '6-7' स्टाईलमध्ये सेलिब्रेशन केले.

सध्या '6-7' हा ट्रेंड विशेषतः Gen Z आणि Gen Alpha मध्ये लोकप्रिय आहे. त्यामुळे मेधावीच्या या सेलिब्रेशनने क्रिकेट चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. या सामन्यात तिने 4 षटकांत 24 धावा देत 2 विकेट घेतल्या. मात्र, सेंट्रल दिल्ली क्वीन्सला हा सामना 29 धावांनी गमवावा लागला.

मेधावीच्या व्हायरल सेलिब्रेशनमागे एक मजेशीर किस्साही आहे. तिला तिचा नेहमीचा 12 नंबरचा जर्सी नंबर हवा होता. मात्र, तो नंबर आधीच दुसऱ्या खेळाडूकडे असल्याने तिला दुसरा नंबर निवडावा लागला. त्यावेळी तिच्या धाकट्या बहिणीने तिला 67 नंबरची जर्सी घालण्याची कल्पना दिली. '6-7' ट्रेंड लक्षात घेऊन तिने हाच नंबर निवडला आणि विकेट घेतल्यानंतर त्याच्याशी जोडलेले हे खास सेलिब्रेशन करण्याचा निर्णय घेतला.

मेधावीने महिला प्रीमियर लीगच्या 2024 च्या लिलावासाठीही आपली नोंदणी केली होती. त्यामुळे दिल्लीच्या क्रिकेटविश्वाबाहेरही तिच्या नावाची चर्चा सुरू झाली होती.

आता DPL 2026 मध्ये सेंट्रल दिल्ली क्वीन्सकडून खेळणाऱ्या मेधावीने पहिल्याच सामन्यात दोन विकेट घेतल्या आहेत. मात्र, तिच्या गोलंदाजीपेक्षाही सध्या तिचे '6-7' सेलिब्रेशन अधिक चर्चेत असून, या युवा लेगस्पिनरला सोशल मीडियावर नवी ओळख मिळाली आहे.

### कोण आहे मेधावी बिधुरी?

मेधावीने महिला प्रीमियर लीगच्या 2024 च्या लिलावासाठीही आपली नोंदणी केली होती. त्यामुळे दिल्लीच्या क्रिकेटविश्वाबाहेरही तिच्या नावाची चर्चा सुरू झाली होती. आता DPL 2026 मध्ये सेंट्रल दिल्ली क्वीन्सकडून खेळणाऱ्या मेधावीने पहिल्याच सामन्यात दोन विकेट घेतल्या आहेत. मात्र, तिच्या गोलंदाजीपेक्षाही सध्या तिचे '6-7' सेलिब्रेशन अधिक चर्चेत असून, या युवा लेगस्पिनरला सोशल मीडियावर नवी ओळख मिळाली आहे. या कामगिरीमुळे मेधावीच्या नावाची पुन्हा एकदा क्रिकेटप्रेमींमध्ये चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, तिच्या जर्सी क्रमांक ६७ आणि '6-7' सेलिब्रेशनच्या अनोख्या कनेक्शनमुळे सोशल मीडियावर तिची लोकप्रियता झपाट्याने वाढत आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 23 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

OPEN MINDS.
EXPLORE IDEAS.
SHAPE TOMORROW.

BA
LIBERAL
ARTS

THE FREEDOM TO EXPLORE.
THE POWER TO CREATE CHANGE.

A multidisciplinary degree that encourages curiosity, builds perspective and prepares you for a world of possibilities.


GLOBAL PERSPECTIVE
Understand the world.

CRITICAL THINKING
Question. Analyze. Evolve.

COMMUNICATION
Express ideas with impact.

INTERDISCIPLINARY LEARNING
Connect concepts. Create solutions.

DIVERSE CAREER PATHS
Endless opportunities await.



SCAN QR TO APPLY

+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in

# मेट्रोसाठी भोसरीचा उड्डाणपूल पाडणार

## NHAI उभारणार आठपदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर; पूल पाडण्यास महापौर रवि लांडगे यांचा विरोध

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो विस्ताराला वेग येणार असून, निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक ते चाकण असा 47.295 किलोमीटर लांबीचा मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. या मार्गासाठी महामेट्रोने 12 हजार 937 कोटी 23 लाख रुपयांचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महापालिकेकडे सादर केला आहे. मात्र, दुसरीकडे नाशिक फाटा ते खेडदरम्यान भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (NHAI) आठपदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्यात येणार असल्याने भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल पाडण्यात येणार असल्याची माहिती सर्वसाधारण सभेत देण्यात आली.**



सध्या पिंपरी ते दापोडी या मार्गावर मेट्रो सेवा सुरू असून, पिंपरी ते निगडी विस्तारित मार्गाचे काम ५० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. त्यानंतर निगडी ते चाकण मेट्रो मार्गामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा उर्वरित भाग मेट्रोने जोडला जाणार आहे. तसेच हिंजवडी आयटी पार्क, पिंपरी-चिंचवड आणि चाकण एमआयडीसी यांच्यात मेट्रोद्वारे थेट कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे. महामेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ यांनी सर्वसाधारण सभेत सुधारित डीपीआरचे सादरीकरण केले. या मार्गावर पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत २८, तर चाकण नगरपालिका हद्दीत सहा, अशी एकूण ३४ स्थानके प्रस्तावित आहेत. या प्रकल्पासाठी महापालिकेचा हिस्सा ३३० कोटी रुपये राहणार आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची एकूण लांबी 47.295 किमी असून, या मार्गावर तब्बल 34 स्थानके उभारण्यात येणार आहेत. यापैकी 28 स्थानके पिंपरी-चिंचवडमध्ये, तर 6 स्थानके चाकण परिसरात असतील. संपूर्ण मार्ग उन्नत (एलिव्हेटेड) स्वरूपाचा असणार आहे. या प्रकल्पासाठी एकूण ₹12,937.23 कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये महापालिकेचा ₹330 कोटी, तर केंद्र व राज्य शासनाचा प्रत्येकी ₹1,721.71 कोटी हिस्सा असेल. त्यामुळे पिंपरी-चिंचवड आणि चाकण परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि आधुनिक होण्यास या प्रकल्पाची मोठी मदत होणार आहे.



### निगडी ते चाकण असा मेट्रोचा विस्तार

प्रस्तावित मेट्रो मार्ग निगडीतील भक्ती-शक्तीपासून ट्रान्सपोर्टनगर, गणेशनगर, मुकाई चौक, रावेत, पुनावळे, ताथवडे, भुमकर चौक, वाकड, विशालनगर, कोकणे चौक, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, नाशिक फाटा, संत तुकारामनगर, भोसरी, मोशी, चिंबळी फाटा, कुरळी, आळंदी फाटा, नाणेकरवाडीमार्गे चाकणपर्यंत जाणार आहे.

### भोसरीचा पूल पाडण्यास महापौरांचा विरोध

नाशिक फाटा ते खेड या ३० किलोमीटर लांबीच्या आठपदरी एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी केंद्र सरकारने ७ हजार ८२७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादन अंतिम टप्प्यात असून, त्याच कामाचा भाग म्हणून भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल पाडण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## आर.के.एल. गॅलेक्सीच्या हंसिका नेदनुरवारचे ‘उडान २०२६’मध्ये सुवर्णयश; नाट्यवाचनात दोन पुरस्कार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**येथील जी.के. गुरुकुल आयोजित ‘उडान २०२६’ या राज्यस्तरीय नाट्य वाचन स्पर्धा आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी हंसिका नेदनुरवार हिने आपल्या अप्रतिम कलागुणांच्या जोरावर दुहेरी मुकुट पटकावत शाळेचा गौरव द्विगुणीत केला आहे.**




हंसिकाने आपल्या उत्कृष्ट नाट्यवाचन आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची व परीक्षकांची मने जिंकली. तिच्या प्रभावी अभिव्यक्तीची आणि संवादाची दखल घेत परीक्षकांनी तिला ‘सर्वोत्कृष्ट नाट्यवाचक’ आणि ‘सर्वोत्कृष्ट शब्दोच्चार’ हे दोन विशेष पुरस्कार देऊन सन्मानित केले. तिची मेहनत, सातत्यपूर्ण सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कलेविषयीची जिद्द यामुळेच हे यश शक्य झाले.

शाळा नेहमीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करते आणि त्यांना मोठी व्यासपीठे उपलब्ध करून देते. याच प्रेरणेतून, पुण्यातील ‘आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल’च्या दोन होतकरू विद्यार्थ्यांनी मलेशियात पार पडलेल्या ‘आंतरराष्ट्रीय सिलंबम (लाठीकाठी) स्पर्धा २०२६’ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

> “हंसिकाने आपल्या कठोर परिश्रमाने आणि सातत्याने हे यश मिळवले आहे. तिचे कलागुण आणि व्यासपीठावरील आत्मविश्वास वाखाणण्याजोगा आहे. भविष्यात ती कला क्षेत्रात नवनवीन शिखरे पादाक्रांत करेल, यात शंका नाही.”
>
> - मिस मित्तल शहा (सीओओ, आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल)


> ”हंसिकाचे हे यश आर.के.एल. गॅलेक्सी परिवारासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. केवळ अभ्यासातच नव्हे, तर सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातही आमचे विद्यार्थी अव्वल ठरत आहेत. तिची ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देणारी ठरेल.”
>
> - डॉ. पुष्कर चौबे (सीईओ, आर.के.एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल)

# 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'चे भव्य आयोजन

## नाटक, संगीत, लावणी, रॉक बँड, कवी संमेलन, स्पर्धा आणि 'रत्न' पुरस्कारांची मेजवानी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सांस्कृतिक चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देणे, स्थानिक कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच शहराच्या कला, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दि. १८ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत तीन दिवसीय महोत्सव संपन्न होणार असल्याची माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली.**



### विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

तीन दिवसीय महोत्सवात सर्व वयोगटांतील नागरिकांचा सहभाग राहील, अशा पद्धतीने विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. नाट्यरसिकांसाठी दर्जेदार व लोकप्रिय व्यावसायिक मराठी नाटकांचे विशेष प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील नामवंत गायक-कलाकारांच्या सहभागातून भावगीत, नाट्यगीत, भक्तिगीत तसेच लोकप्रिय मराठी-हिंदी गीतांचा समावेश असलेली संगीत मैफल आयोजित करण्यात येणार आहे.

### शहराची सांस्कृतिक नगरी म्हणून ओळख अधिक दृढ व्हावी

पिंपरी-चिंचवड शहर हे देशातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र या शहराला कला, साहित्य, नाट्य, संगीत आणि लोकसंस्कृतीचीही समृद्ध परंपरा लाभली आहे. शहरातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देऊन ही सांस्कृतिक ओळख अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महोत्सव महत्त्वपूर्ण ठरेल. हा महोत्सव केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता विविध पिढ्या, कलाकार आणि नागरिकांना एकत्र आणणारे सांस्कृतिक व्यासपीठ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

महोत्सवाच्या आयोजनाबाबत आयोजित पत्रकार परिषदेत महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महोत्सवाच्या स्वरूपाची व नियोजित कार्यक्रमांची माहिती दिली.

पिंपरी-चिंचवड शहराने औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रासोबतच कला, साहित्य, नाट्य, संगीत, क्रीडा आणि लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शहरातील या सांस्कृतिक ऊर्जेला एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणे, विविध पिढ्यांना सांस्कृतिक उपक्रमांशी जोडणे आणि गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा अधिक दृढ करणे हा महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या पारंपरिक लावणीचे सादरीकरण, तरुणाईसाठी आधुनिक संगीत आणि फ्यूजनचा समावेश असलेला रॉक बँड परफॉर्मन्स तसेच विविध सामाजिक विषय, हास्य-विनोद आणि समकालीन आशय मांडणाऱ्या नामवंत कवींचे राज्यस्तरीय कवी संमेलन हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. महिलांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी पाककला स्पर्धा आणि फॅशन शो आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या लाठी-काठी, दांडपट्टा व अन्य मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके देखील सादर करण्यात येणार आहेत.

बालकलाकारांच्या अभिनय व सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी बालनाट्य व बाल एकांकिका स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच पारंपरिक वस्तू, हस्तकला, स्थानिक कलाकुसर आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'संस्कृती जत्रा' व प्रदर्शनाचे आयोजनही महोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

बालकलाकारांच्या अभिनय व सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी बालनाट्य व बाल एकांकिका स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच

### शहरातील गुणवंतांचा 'रत्न' पुरस्कारांनी गौरव

पिंपरी-चिंचवड शहराच्या नावलौकिकात भर घालणाऱ्या तसेच आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य व कामगिरी करणाऱ्या गुणवंत व्यक्तींचा महोत्सवादरम्यान विशेष गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये 'कलारत्न', 'साहित्यरत्न', 'क्रीडारत्न', 'नृत्यरत्न' आणि 'संगीतरत्न' या पुरस्कारांचा समावेश आहे. या पुरस्कारांच्या माध्यमातून शहरातील गुणवंतांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या योगदानाला प्रोत्साहन देण्याचा महोत्सव समितीचा प्रयत्न आहे.

पारंपरिक वस्तू, हस्तकला, स्थानिक कलाकुसर आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'संस्कृती जत्रा' व प्रदर्शनाचे आयोजनही महोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या आनंदात भर घालणाऱ्या या तीन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवात शहरातील नागरिक, कलाप्रेमी, महिला, युवक-युवती तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने सहभागी होऊन विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## 80th Independence Day Celebrated at Dr. D. Y. Patil Varale Campus

**MahaEnews । PIMPRI-CHINCHWAD**

**Dr. D. Y. Patil Educational Federation, Varale Campus, Pune, celebrated the 80th Independence Day of India with great pride, enthusiasm, and patriotic spirit on 15th August 2026.**




The celebration was graced by the esteemed presence of Chief Guest Shri. Vishnu Sitabai Natha Tamhane, Former Assistant Commissioner of Police, Pune City Police, along with distinguished Guests of Honour Dr. Sushant V. Patil, President, DYPEF; Adv. Anuja Sushant Patil, Secretary, DYPEF; and Shri. Vidhyanand Mankar, Executive Director, DYPEF. The event was also attended by Dr. Suresh Mali, Director, DYPCOEI; Dr. Meghang Bhilare, Director, DYPIMED; HODs, faculty members, staff, and students.

The programme commenced with the spirit of national pride and remembrance of the countless sacrifices made by our freedom fighters. The presence of distinguished guests added significance to the occasion, inspiring students and staff to uphold the values of freedom, unity, integrity, and responsibility towards the nation. A particularly heartfelt moment of the celebration was the *tribute paid to the late Padma Shri Dr. D. Y. Patil Dada*, whose visionary contribution to education and society continues to inspire generations. The dignitaries paid their respects and remembered his remarkable legacy, values, and enduring contribution to the field of education.

The celebration reflected the institution's commitment to nurturing responsible, socially conscious, and patriotic citizens who will contribute meaningfully to the progress of the nation.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507